
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2024
सकाळ



कोल्हापूर : उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वेबिनारसाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# शिष्यवृत्तीतून उच्च शिक्षणातील वाटचाल सुकर करा : पाटील

## विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी ऑनलाईन संवाद

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी अनेक शिष्यवृत्तींसह विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यांचा लाभ घेऊन उच्चशिक्षण क्षेत्रातील वाटचाल सुकर करावी, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज केले.

मंत्री पाटील यांनी आज सकाळी दहा वाजता ऑनलाईन वेबिनारच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी, पालक, शिक्षकांशी संवाद साधला. नुकत्याच ८ जुलैला घेतलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खासगी अभिमत विद्यापीठ, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) आणि सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोट्यातील अथवा संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित, तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नूतनीकरण केलेल्या) मुलींना शंभर टक्के लाभ देण्यास चालू शैक्षणिक वर्षापासून शासन मान्यता दिल्याची माहिती मंत्री पाटील यांनी दिली.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या वेबिनारला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव भक्ती नाळे आदी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2024
लोकमत

## शैक्षणिक योजनांचा लाभ घ्या

कोल्हापूर : शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी अनेक शिष्यवृत्तींसह विविध योजना राबविण्यात येत आहेत, त्यांचा लाभ घेऊन उच्चशिक्षण क्षेत्रातील वाटचाल सुकर करावी, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केले. मंत्री पाटील यांनी ऑनलाइन वेबिनारच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी, पालक, शिक्षक

यांच्याशी संवाद साधला. या वेबिनारला कुलगुरू डॉ.डी.टी शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2024
पुण्यनगरी

# डॉ. घाळी कॉलेजचा कॉमर्स विभाग विद्यापीठात प्रथम

गडहिंग्लज : प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रथम क्रमांकाचे पारितोषिक निमशहरी विभागातून डॉ. घाळी कॉलेजच्या कॉमर्स आणि व्यवस्थापन विभागास प्राप्त झाले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, सहसचिव गजेंद्र बंदी, प्र. प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, एम. डी. पुजारी यांनी हे पारितोषिक स्वीकारले. यापूर्वी सलग तीन वेळा हे पारितोषिक डॉ. घाळी कॉलेजला मिळाले असून, यंदा चौथ्यांदा प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याचबरोबर यापूर्वी मानव्यशास्त्र विभागास निमशहरी भागातून सलग सातवेळा प्रथम पारितोषिक मिळाले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजयसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, जितेंद्र बिंदे, पी. पी. पुजारी, राजश्री म्हंकावे यांच्यासह प्राचार्य, संस्थाचालक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2024
सकाळ



आसुर्ले पोर्ले : येथे गुणवंतांचा सत्कार करताना व्ही. एन. शिंदे, एन. डी. चौगुले आदी.

# पोर्ले कला महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

पोर्ले तर्फ ठाणे : येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव झाला. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. संतोष निंबाळकर व संस्थेच्या संचालिका शारदा लवटे, प्रा. ए. डी. चौगुले, मानसचिव एस. एस. पाटील तसेच प्रभारी प्राचार्य आर. एस. पाटील, उपप्राचार्य व्ही. बी. तळेकर, संस्थेचे संचालक सदाशिव अडकूर तसेच मुख्याध्यापक प्रकाश कुंभार उपस्थित होते. यावेळी ४० विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. संतोष निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. ए. डी. चौगुले यांनी संस्थेचा कार्याचा आढावा घेतला. आर. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ए. बी. कांबळे, प्रा. एम. पी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एम. शिंदे यांनी आभार मानले.

2 6 JUL 2024

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संस्थेचे भागीदार म्हणून काम करा

## मेधा जेरे : विद्यापीठात बँक कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : कर्मचारी कोणत्याही श्रेणीचा असला तरी त्याने कामावर नि:स्वार्थीपणे प्रेम केले पाहिजे. काम समाजात ओळख प्राप्त करून देते. त्यामुळे काम करताना ते कर्मचारी म्हणून नव्हेतर संस्थेचे भागीदार म्हणून करा, असा सल्ला पुणे येथील लाइफ व सॉफ्ट स्कील प्रशिक्षक मेधा जेरे यांनी येथे दिला. कोणत्याही संस्थेचा चतुर्थश्रेणी कर्मचारी हा ब्रॅन्ड ॲम्बॅसॅडर (सदिच्छादूत) असतो, असेही त्या म्हणाल्या.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनतर्फे आयोजित 'नागरी सहकारी बँकांमधील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमधील कार्य नैतिकता' विषयावर एकदिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम झाला. त्या वेळी त्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मेधा जेरे.

बोलत होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

जेरे म्हणाल्या, ''ग्राहकाला सेवा देण्यासाठी आहोत, हे तर खरेच; पण त्या सेवेपलीकडे ग्राहक आपल्या आस्थापनेतून जाताना अनुभव घेऊन जात असतो. विशेषतः बँकिंग क्षेत्रात येणाऱ्या ग्राहकाची पहिली भेट ही चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याशी होते. त्यामुळे त्याला मनापासून सेवा दिली, तर तो कर्मचारी आणि त्याची संस्था या दोघांनाही ग्राहकाच्या हृदयात स्थान मिळते. कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी नवनवे ज्ञान आत्मसात करण्यास प्राधान्य द्यावे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान सामोरे असताना आपल्या कामाशी, ग्राहकांशी भावनिकदृष्ट्या नाते जोडावे.''

डॉ. शिंदे म्हणाले, ''शिक्षणाचे उपयोजन दैनंदिन कामकाजात प्रभावी पद्धतीने कसे करावे, याचे मार्गदर्शन करण्यासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांची मोठी गरज आहे. भोवतालच्या आणि विशेषतः कार्यस्थळाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या मनात आपुलकीची भावना आणि जाणिवा असणे फार महत्त्वाचे असते. एखादी संस्था केवळ आपल्याला नोकरी, पगार देत नाही, तर त्यासोबत एक सामाजिक प्रतिष्ठाही प्रदान करत असते.'' प्रा. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले.

26 JUL 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मोडी लिपी'साठी विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर; ता. २५ : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे १२ ऑगस्टपर्यंत मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी सहा महिन्यांचा असून, प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेची पदवी अनिवार्य आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी मोडी लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊच शकत नाही, हे लक्षात घेऊन मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र इतिहास अधिविभागातर्फे राबविण्यात येत आहे. विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहास प्रेमींनी त्याचा लाभ घ्यावा, असे आव्हान समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

26 JUL 2024

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भयमुक्त समाजासाठी मानसतज्ज्ञांचे योगदान महत्त्वाचे

## डॉ. अमोल मिणचेकर : शिवाजी विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांची शुश्रुषा संस्थेला क्षेत्रभेट

■ सकाळ वृत्तसेवा

इस्लामपूर, ता. २५ : ''आजचा समाज विविध समस्यांच्या भीतीनं ग्रासला आहे. व्यसन, निराशा आणि अवास्तव कल्पनांनी भरकटलेल्या समाजाला भयमुक्त करण्यासाठी मानसतज्ज्ञांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे,'' असे मत शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे विभागप्रमुख प्रा. डॉ. अमोल मिणचेकर यांनी व्यक्त केले.



इस्लामपूर : शिवाजी विद्यापीठातील प्रशिक्षणार्थी समवेत शुश्रुषाचे अध्यक्ष कालिदास पाटील व प्रा. डॉ. अमोल मिणचेकर.

येथील शुश्रुषा सल्ला, मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्थेमध्ये शिवाजी विद्यापीठातील मेडिकल सोशल वर्कर विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या मानसशास्त्रीय क्षेत्रभेटप्रसंगी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना प्रा. मिणचेकर बोलत होते.

डॉ. मिणचेकर म्हणाले, ''माणसाला आपल्या जीवनात संकुचित विचाराने न जगता, उत्साहपूर्ण पद्धतीने भरभरून जगता आले पाहिजे. मनातील नको असलेल्या विचारांचा निचरा करून भयमुक्त होऊन जगता आले पाहिजे. संस्थेचे अद्ययावत मनोमापन कक्ष, समुपदेशन व प्रशिक्षण सुविधा, संशोधन कार्य, शैक्षणिक प्रकल्प यामुळे मानसशास्त्र विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य क्षेत्रात भरीव कार्य करण्याची दिशा मिळेल.''

मानसतज्ज्ञ डॉ. कालिदास पाटील म्हणाले, ''आयुष्य मुठीत ठेवून न जगता दिलखुलास पद्धतीने जगले पाहिजे. विद्यार्थिदशेपासूनच राग, भीती, निराशा, चिंता, उदासीनता, नकारात्मकता मनातून काढून टाकता आले पाहिजे. भावनिक साक्षरतेतून जीवनात रंग भरता येतात. स्वतःच्या भावना ओळखा. स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवायला शिका. स्वतःवर प्रेम करा. स्वतःच्या वेदनेसमवेत समाजाच्या वेदनाही जाणा. इतरांनाही मोठं होण्यासाठी प्रोत्साहित करा.''

सूरज कदम यांनी स्वागत केले. तेजस्विनी पाटील यांनी आभार मानले. वसुंधरा पाटील यांनी संयोजन केले. शबाना जमादार, सिमरन आगा, वैष्णवी यादव, प्रीती कांबळे, श्रीआर्य लोंढे, प्रेम भोसले, योगेश काळे, राहुल नलवडे, संकेत वाघमारे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUL 2024
लोकमत

# सागरा(चा) प्राण तळमळला!



## भवताल

डॉ. रसिया पडळकर

**समुद्रातील बदललेली क्षारता व तापमानामुळे प्रवाहात बदल होतो. अशी उलथापालथ तापमानवाढ, प्रदूषणामुळे होते आहे. त्यामुळे सागराचाच प्राण तळमळू लागला असे म्हणायची वेळ आली आहे.**

आदिम काळापासून समुद्र आणि मानवाचं एक नातं आहे. भारतीय पुराणातल्या समुद्रमंथनापासून ते आधुनिक काळात समुद्रतळाला छेदून त्यातून काढलेल्या खनिज तेलापर्यंत. या नात्याचे काही पैलू आपण बघितले. यासारखेच आणखी अनेक आहेत ज्यातील काहींचं स्वरूप खरं तर भयावह आहे; पण अथांग समुद्राच्या तळाशी, मध्याशी काय सुरू आहे हे रोजच्या रोज आपल्याला कुठे कळणार आहे ! दैनंदिन जीवनात आपला समुद्राशी संबंध येतो कुठे?

पण थोडं कान देऊन ऐकलं तर लक्षात येतं की, आपल्या आधुनिक, प्रगत जीवनात समुद्र जिथे तिथे गाज घालतो, आपण ती ऐकत नाही इतकेच.

आपण रोज वापरतो ते पेट्रोल, डिझेल म्हणजेच खनिज तेल (क्रूड ऑइल) मुख्यता समुद्रामार्गे आयात होते. भारतातील खनिज तेलाचा सर्वांत मोठा साठा म्हणजे उरणजवळील बॉम्बे हाय; हादेखील समुद्रातच आहे. हे खनिज तेल ज्यावेळी मोठ्या कंटेनर्समधून वाहून आणले जाते, त्यावेळी अनेकदा यातून गळती होते. काही वेळा अपघात होऊन हे कंटेनर्स फुटतात आणि यातील काळ्या रंगाचे चिकट, दाट, अपारदर्शक असे खनिज तेल समुद्रावर पसरते. तेलाची घनता पाण्यापेक्षा कमी असल्याने हे कायमच पाण्यावर तरंगत राहाते. वाऱ्यामुळे आणि समुद्राच्या तरंगांमुळे तेलाचा हा तवंग वेगाने पसरतो आणि मैलोगणती समुद्राचा पृष्ठभाग या तेलाने व्यापला जातो. समुद्राच्या पाण्याच्या सर्वांत वरती असतात एकपेशीय शैवाल (फायटोप्लांकटॉन). हे समुद्र अन्नसाखळीतील सर्वांत पहिली आणि सर्वांत महत्त्वाची कडी असतात. तेलाच्या या तवंगाने या हरीत शैवालांना मिळणारा सूर्यप्रकाश अडविला जातो आणि त्यांची अन्न बनविण्याची क्षमताच मंदावते. परिणामी पुढच्या सर्वच जिवांवर त्याचा परिणाम होतो. अनेक स्थलांतरित पक्षी, बदके, डॉल्फिन, व्हेलसारखे समुद्राच्या पृष्ठभगावर जा-ये करणारे जीव या तेलाने अच्छादले जातात आणि त्यांच्या श्वसन अवयवांवर परिणाम होऊन ते मृत्यू पावतात.

समुद्राच्या मधे, प्रचंड मोठ्या पृष्ठभागावर पसरलेल्या या तेलाला रोखणे, थांबविणे, परत भरणे केवळ अशक्य असते. जैवतंत्रज्ञानातील काही संशोधनाच्या मदतीने यावर आळा घालता येतो; पण जिथे कायमच तोट्याचे खापर सर्वजनिक बाबींवर फोडले जाते, तिथे पर्यावरणीय हानीला कोण विचारतो? हे पसरलेले तेल गोळा करण्याची किंमत तेलापेक्षा जास्त होणार असेल तर, नफालोलुप जगात कायमच पर्यावरणीय खर्चाला नफा-तोट्याच्या गणितातून वगळले जाते. आणि परिणामी निसर्गाच्या खात्यात कायम तोटाच जमा होतो.

पृथ्वीच्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर बर्फाच्छादित टोप्या आहेत. साधारण चार कोटी वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या, समुद्राच्या पाण्यावर तरंगणाऱ्या या टोप्या गोड्या पाण्याच्या बर्फापासून बनलेल्या आहेत..! या टोप्या पृथ्वीच्या वातावरणाचे आणि समुद्राच्या पाण्याचे तापमान संतुलित करणे, तसेच सूर्यप्रकाशातील मोठा भाग पुन्हा परावर्तित करणे, ध्रुवीय अस्वलासारख्या जीवांचा अधिवास असणे अशी कामे करत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे या टोप्या वेगाने वितळत आहेत. त्यामुळे यातील गोडे पाणी समुद्रात मिसळत असून, समुद्राच्या पाण्याची क्षारता कमी होते आहे आणि समुद्राच्या पाणी पातळीत वाढ होते आहे.

समुद्रामध्ये अनेक प्रवाह असतात, एल निनोबद्दल आपण समजून घेतले आहेच, हे प्रवाहदेखील या बदललेल्या क्षारतेमुळे त्याचबरोबर तापमानामुळे आपल्या प्रवाहात बदल करतात. अशी प्रचंड उलथापालथ जागतिक तापमानवाढीमुळे, समुद्रातील प्रदूषणामुळे आणि अमर्याद अशा उत्खननामुळे होते आहे. सागरा प्राण तळमळला असं म्हणायच्या ऐवजी आता सागराचाच प्राण तळमळू लागल्याचे गंभीर वास्तव आहे.

